14 FEB 2018

जा.क्र. पोआअ / पशा-4 / पंचर दुरुस्ती वार्षिक दरकरार / 1585 / 2018 अमरावती शहर दिनांक / 02 / 2018

विषय :- पोलीस आयुक्त अमरावती शहर आस्थापनेवरील एकुण 236 पोलीस मोटार वाहनांचे पंचर दुरुस्तीची कामे करण्याकरिता वार्षिक दरकरार करण्याकरिता दोन लिफाफा पध्दतीनुसार दरपत्रके सादर करणे बाबत.

उपरोक्त संदर्भ व विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, पोलीस आयुक्त अमरावती शहर आस्थापनेवर 141 चार चाकी व 95 मोटार सायकल वाहने असे एकुण 236 मोटार वाहनांचे पंचर दुरुस्तीची कामे करण्याकरिता वार्षिक दरकरार करावयाचा असल्याने दोन लिफाफा पध्दतीनुसार सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

तरी ईच्छुक पंचर दुरुस्ती कामे करणाऱ्या दुकानदारांनी त्यांची दोन लिफाफा पध्दतीनुसार सिलबंद दरपत्रके या कार्यालयातील पत्रव्यवहार शाखेत दिनांक 21 / 02 / 2018 ला 12.00 वाजेपर्यंत (शासकीय सुटी वगळून) सादर करावीत.

पहिला लिफाफा हा तांत्रिक लिफाफा म्हणून (लिफाफा-1) व दुसरा लिफाफा (लिफाफा-2 दरपत्रक) असे दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रके सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा-1 मध्ये खालील नमुद केलेले कागदपत्रे आढळुन आल्यानंतरच दरपत्रकाचा दुसरा लिफाफा उघडण्यात येईल याची कृपया निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

<u>लिफाफा क्रमांक-1 तांत्रिक लिफाफामध्ये खालील नमुद कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.</u>

1. दुकानाचे नोंदणी प्रमाणपत्राची स्वतः प्रमाणीत केलेली (Self Attest) प्रत.
2. पॅन कार्डचीस्वतः प्रमाणीत केलेली (Self Attest) प्रत.
3. आधार कार्डची स्वतः प्रमाणीत केलेली (Self Attest) प्रत.
4. यापुर्वी राज्य शासन / केंद्र शासनाशी दरकरार केला असल्यास अनुभव प्रमाणपत्राची छायांकीत प्रत.
5. जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्राची स्वतः प्रमाणीत केलेली (Self Attest) प्रत.

पोलीस मोटार वाहनांचे पंचर दुरुस्तीची कामे कामे करण्याकरिता प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक 22.02.2018 चे 12.00 वा. उघडण्यात येईल. यामध्ये काही बदल झाल्यास संबंधीतांना दुरध्वनीव्दारे / ई-मेलव्दारे सूचीत करण्यात येईल.

<u>लिफाफा क्रमांक-02 दरपत्रकाच्या लिफाफामध्ये करावयाच्या कामाचे स्वतंत्रपणे दर नमुद करुन दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे.</u>

<u>पोलीस मोटार वाहनांची पंचर दुरुस्ती कामाचे अटी व शर्ती पुढील प्रमाणे :-</u>

1. पंचर दुरस्ती कामाचे दर अधिकृत सर्व्हिसिंग सेंटर पेक्षा जास्त नसावे.
2. पोलीस मोटार वाहनांचे पंचर दुरुस्ती कामाला प्रथम प्राधान्य द्यावे लागेल व त्वरीत प्रभावाने पंचर दुरुस्ती कामे करावे लागेल.
3. दुरुस्ती केलेल्या कामात दोष निर्माण झाल्यास त्याचे विनामुल्य निराकरण करुन देणे दुकानदारांना बंधनकारक राहील.
4. दुरुस्ती कामाचे दरामध्ये सर्व कर समाविष्ट करावे लागेल व त्याप्रमाणे दर सुची दयावी लागेल.
5. पंचर दुरुस्ती कामात बेसिक डिस्काउंट देय असल्यास % चा उल्लेख करावा लागेल.
6. निविदा मंजुरी नंतर आदेश पारीत केल्यानंतर रुपये 100/- चे मुद्रांक शुल्कावर करारनामा करुन दयावा लागेल.
7. देयकाची रक्कम CMP व्दारे प्रदान करण्यात येईल त्यामुळे CMP करिता लागणारे दस्ताऐवज सादर करावे लागेल.

सदरचे पत्र हे या कार्यालयाचे cp.amravati@mahapolice.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा अपलोड करण्यात आलेले आहेत. प्राप्त निविदापैकी निविदा स्विकृत करण्याचा / नाकारण्याचा अंतिम अधिकार पोलीस आयुक्त अमरावती शहर यांनी राखुन ठेवलेला आहे.

( प्रदिप चव्हाण )
पोलीस उपायुक्त (मुख्यालय)
अमरावती शहर

प्रति, ------------------------------------------------------------------------

प्रत,

पोउपनि, सायबर सेल,
2/- उपरोक्त पत्र हे या कार्यालयाचे संकेतस्थळावर अपलोड करुन पुर्तता अहवाल सादर करावा.

# <u>दरपत्रक</u>

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार व कामाचे विवरण | दर |
|---|---|---|
| 01 | कार / जिप वाहनाचे टयुबलेस टायर पंचर दुरुस्ती करणे | |
| 02 | कार / जिप वाहनाचे टायर पंचर दुरुस्ती करणे | |
| 03 | लाईट व्हॅन वाहनाचे टायर पंचर दुरुस्ती करणे | |
| 04 | प्रिझन व्हॅन वाहनाचे टायर पंचर दुरुस्ती करणे | |
| 05 | ट्रक / वरुण वाहनाचे टायर पंचर दुरुस्ती करणे | |
| 06 | कार / जिप वाहनाचे टायर खोल फिटींग करणे. | |
| 07 | लाईट व्हॅन वाहनाचे टायर खोल फिटींग करणे. | |
| 08 | प्रिझन व्हॅन वाहनाचे टायर खोल फिटींग करणे. | |
| 09 | ट्रक / वरुण वाहनाचे टायर खोल फिटींग करणे. | |
| 10 | कार / जिप वाहनाचे टयुबलेस व्हॉलसीट दुरुस्ती करणे | |
| 11 | कार / जिप वाहनाचे साधे व्हॉलसीट दुरुस्ती करणे | |
| 12 | लाईट व्हॅन वाहनाचे व्हॉलसीट दुरुस्ती करणे | |
| 13 | प्रिझन व्हॅन वाहनाचे व्हॉलसीट दुरुस्ती करणे | |
| 14 | ट्रक / वरुण वाहनाचे व्हॉलसीट दुरुस्ती करणे | |
| 15 | मोटार सायकल वाहनाचे टयुबलेस टायर पंचर दुरुस्ती करणे | |
| 16 | मोटार सायकल वाहनाचे टायर पंचर दुरुस्ती करणे | |

सही

पुरवठादार / दुरुस्तीकाराचे नांव